**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र.कृआ/विप्र.४/पंदेकृरत्नपुर./मा.सू.२०१२/१४७/२०१३
कृषि आयुक्तालय, म.रा.,कृषि भवन,पुणे- ५,
दिनांक :- ०८/०३/२०१३

प्रति,

विभागीय कृषि सह संचालक
----------विभाग -------

विषय :- सन २०१२ करीता डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कारासाठी व्यक्तीची व संस्थेची निवड करणेबाबत...

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषि क्षेत्रात केलेल्या अलौकीक कार्याचा गौरव, म्हणून राज्यातील व्यक्ती /संस्थांची निवड डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कारासाठी करावयाची आहे. व्यक्ती /संस्थांची निवड करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात.

१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार हा कृषि क्षेत्रात दिला जाणारा राज्यातील सर्वोच्च पुरस्कार आहे.ही बाब लक्षात घेऊन व्यक्ती /संस्थेच्या नावाची शिफारस करावी. सदर पुरस्कार राज्यात दरवर्षी फक्त एकाच व्यक्तीस/संस्थेस देण्यात येतो. तेव्हा ही व्यक्ती/संस्था यांचे कार्य हे त्या क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय असणे आवश्यक आहे. असे कार्य तपासणीसाठी केवळ विशिष्ठ प्रपत्रात माहीती मागविणे व त्या माहितीच्या आधारे अशा सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड करणे योग्य होणार नाही. मात्र या पुरस्कारासाठी शिफारस करताना अशा व्यक्ती / संस्थेची कृषि उत्पादन, कृषि विस्तार, निर्यात, कृषि प्रक्रिया, पिक फेरबदल, कृषि उत्पादन वाढीसाठी वापरलेले आधुनिक तंत्रज्ञान यामधील त्यांच्या कार्य तसेच या व्यक्तीचे /संस्थेचे समाजातील स्थान याबाबत सर्वकष विचार या ठिकाणी करणे अत्यंत आवश्यक आहे. मुख्यतः अशी व्यक्ती / संस्था कोरडवाहू क्षेत्रात काम करीत असल्यास त्यांना त्यांच्या क्षेत्रात कोरडवाहू तंत्रज्ञानाचा पुरेंपूर वापर केला किंवा कसे ? याचा प्रकर्षाने विचार करावा. तसेच हे कोरडवाहू तंत्रज्ञान इतर

शेतक-यांसांठी उपयुक्त ठरेल किंवा कसे ? त्यांचे शेतातील प्रयोगाचे नवनविन उपक्रमाचा इतर शेतक-यांना कितपत फायदा होतो, या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. सदरची संस्था/व्यक्ती कोरडवाहू क्षेत्रातून प्रति हेक्टरी किती उत्पादन काढते, याचा अंदाज घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे मागील २०-२५ वर्षामध्ये शेतीचा अनुभव असणा-या व्यक्तीस/संस्थेस प्राधान्य देता येईल, ही बाब लक्षात घेऊन त्यांच्या मागील २०-२५ वर्षातील शेतीविषयक कामगिरीचा विचार करावा.

२) जागतीक व्यापार संघटनेच्या करारा अन्वये शेती हा व्यवसाय खुला झालेला आहे, ही बाब लक्षात घेऊन शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोणही बदलला आहे. आता उच्च तंत्रज्ञानाच्या आधारावरील शेतीस महत्व प्राप्त झालेले आहे. पुरस्कारासाठी उच्च तंत्रज्ञान वापरुन शेतीमध्ये पुढाकार घेणा-या व्यक्तीचा /संस्थेचा सुध्दा पुरस्कारासाठी विचार करण्याची गरज आहे. यामध्ये हरीतगृहातील शेतीचा व्यवसाय करणे, औषधी सुगंधी वनस्पतीचे संवर्धन करणे व विक्रीमध्ये पुढाकार घेणे व याबाबत शेतक-यांना मार्गदर्शक व उच्च दर्जाची कामगिरी करणा-या व्यक्ती/संस्थांचा विचार करणे आवश्यक आहे. शेती सोबतच फुलशेती, दुग्धव्यवसाय इ. पुरक व्यवसायामध्ये पुढाकार घेऊन मार्गदर्शक ठरणा-या व्यक्ती/संस्थेचा विचार करण्यांत यावा.

शेती व्यवसाय कच्चा माल निर्माण करण्यापुरता मर्यादीत राहीलेला नाही. शेतातील उत्पादीत होणारा कच्चा माल यावर योग्य प्रक्रीया करुन योंग्य त्याप्रकारे पॅकींग करणे, ग्रेडींग करणे याबाबीस दिवसेदिवस महत्व प्राप्त होत आहे. अशा विविध क्षेत्रात कार्य करणा-या व्यक्ती / संस्थेचा सुध्दा पुरस्कारासाठी विचार करावा.अशी व्यक्ती/संस्था शेतीबरोबरच इतर शेतीशी पुरक असे व्यवसाय करीत असल्यास शेतीव्यतीरिक्त पुरक व्यवसायामधील त्यांचे प्राविण्य विचारात घ्यावे. त्यांचा हा पुरक व्यवसाय या शेती विषयक क्षेत्रात मार्गदर्शक ठरत असल्याचे दिसुन येणे आवश्यक आहे. प्रस्ताव सादर करताना संस्था अथवा व्यक्तीने माहिती स्वतः भरणे अपेक्षित आहे ती भरण्यास केवळ कृषि विभागाच्या अधिकारी/ कर्मचारी यांनी मदत करावी.

सन २०१२ करीता कृषिरत्न या पुरस्कारासाठी योग्य व्यक्ती/संस्थेची निवड होण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्रमांक १००३/प्र.क्रं.५२/ ११ अे, दिनांक २२ ऑगष्ट २००३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा व विभागीय स्तरावर समित्या गठीत केलेल्या असाव्यात. पुरस्काराकरीता शिफारशी साठी पुरस्कारार्थींची सर्वसाधारण माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये तर त्याच्या उल्लेखनीय कार्याबाबतची माहिती प्रपत्र ब मध्ये प्राप्त करुन घ्यावी. प्रपत्र क मध्ये संबंधितांच्या प्रस्तावाची थोडक्यात माहिती आयुक्तालयास सादर करावी. जिल्हा स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीने जिल्हयातील सर्व पुरस्कारार्थींच्या प्रक्षेत्रास समक्ष भेट देऊन तपासणी करावी. विभागीय स्तरावर प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावाची छानननी करुन शिफारशीसह कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

कृषी विकासांसाठी उल्लेखनिय कामाबाबत कृषी विभाग, महाराष्ट्र शासनाचे वतीने कृषी पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या व्यक्ति, संस्थांचा पुनःश्च इतर कृषी पुरस्कारासाठी प्रस्ताव प्राप्त होतात. अशा परिस्थितीत प्रस्तावाची गुणवत्तेनूसार शिफारस करतांना यापूर्वी देण्यात आलेल्या कृषी पुरस्कारास पाच वर्षाचा कालावधी झाला असल्याची खात्री करण्यात यावे. सदर पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावाची छानननी विभागीय कृषि सह संचालक यानीं स्वतः प्रत्यक्ष प्रक्षेत्रास भेट देऊन करावी व तसे अभिप्राय प्रस्तावा सोबत जोडावे.

प्रपत्रामध्ये व्यक्तीची पार्श्वभुमी, शिक्षण, केलेले कार्य, इतर शेतकऱ्यांना झालेला फायदा व शासन / कृषि क्षेत्रात सहभाग घेतलेला असावा. शासकिय किंवा शासन अंगीकृत व सहकारी संस्था जसे कि, स्थानिक स्वराज्य संस्था, कृषि विदयापीठे यांच्या आस्थापनावर काम करणारे किंवा सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत तसेच केंद्र व राज्यशासनाकडुन किंवा शासन अंगीकृत संस्थेकडुन कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी संस्था किंवा व्यक्ती पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत.

तसेच मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचेकडूनही काही व्यक्तींची शिफारस करण्यात येते. तसेच विभागाचे सचिव व विभागीय आयुक्त यांचेकडून काही व्यक्तींची शिफारस करण्यांत

येते.  अशा प्रकारे शासनाकडून शिफारस केलेले प्रस्ताव कृषि आयुक्तालयास प्राप्त होतात. माहिती विहित प्रपत्रात नसल्यामुळे त्या व्यक्तींची माहिती विहित प्रपत्रात प्राप्त करुन घेण्यासाठी व वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी सदर प्रस्ताव अभिप्रायासाठी आपणाकडे पाठविण्यांत येतील.  अशा परस्पर प्राप्त प्रस्तावाची छाननी जिल्हा व विभागीय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत करावी. पुरस्कारार्थींच्या कामाबाबत व त्यांचे काम अतिउत्कृष्ट किंवा उल्लेखनिय का आहे,  याबाबत समितीने अभिप्राय दयावेत. वरील सर्व बाबींचा विचार करुन आपल्या विभागातील व्यक्ती/संस्थाचे प्रस्ताव कृषि आयुक्तालयास दिनांक:-२५/०३/२०१३ पर्यत सादर करावेत.

सोबत : प्रपत्र अ, ब व क

स्वाक्षरित/-

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

प्रत :-

माहितीस्तव सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव (कृषि व फलोत्पादन), कृषि व प. दु. म. विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
२. मा. आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय / साखर / सहकार / महसूल (सर्व) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,....................... (सर्व)
४. कृषि विकास अधिकारी, जि.प........................    (सर्व)

स्वाक्षरित/-

**कृषि उपसंचालक (माहिती)**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रपत्र अ (कृषिरत्न)**

| | | |
|---|---|---|
| १ | व्यक्तीचे संपूर्ण नांव | |
| २ | कायमचा पत्ता ( संपूर्ण पत्ता दयावा) | |
| ३ | पत्रव्यवहारासाठी पूर्ण पत्ता | |
| ४ | अ. दुरध्वनी क्रमांक (एस.टी.डी. कोडसहीत)<br>ब. भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नंबर) | |
| ५ | अ. ई-मेल<br>ब. वेबसाईट | |
| ६ | जन्मतारीख व वय | |
| ७ | शिक्षण | |
| ८ | व्यवसाय | |
| ९ | शेतकऱ्याचा आधार कार्ड क्रमांक व बँकेचा खाते क्रमांक | |
| १० | त्यांना शासन / शासन पुरस्कृत संस्थेमार्फत पगार / पेन्शन मिळते काय ?(रु. १०० च्या स्टँपवर शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसलेबाबत प्रतिज्ञापत्र) | |
| ११ | पूर्वी मिळालेला सन्मान/पुरस्कार आणि कोणत्या वर्षी व कशासाठी. (प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह जोडावा) | |
| १२ | चारित्र्य कसे आहे (सोबत जि.पो.अ.दाखला मुळप्रत असावी) | |
| १३ | वरील व्यक्तीचे केलेले काम सर्वसामान्य शेतक-यांना उपयोगी मार्गदर्शक कसे तसेच त्यांचे काम अतिउत्कृष्ट किंवा उल्लेखनिय कसे याबाबत सविस्तर माहिती. | |
| १४ | परिचय लेख (सोबत स्वतंत्र देण्यात यावा). | |
| १५ | माहिती तंत्रज्ञानाचा कृषि विकासाकरीता वापर करतात का ? कशाप्रकारे करतात ? | |
| १६ | कृषि विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष शेतीस भेट देऊन प्रस्ताव निकषाप्रमाणे योग्य असल्यास शिफारशीसह अभिप्राय दयावेत. | |

सही/-
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद

सही/-
जिल्हा अधिक्षककृषिअधिकारी
जिल्हा

**प्रपत्र ब (कृषिरत्न)**

| | | |
|---|---|---|
| १ | शेतकऱ्याचे नांव व पत्ता | |
| २ | धारण केलेले एकूण क्षेत्र हे. ( ८ अ प्रमाणे) | |
| ३ | फळबाग लागवडीचे क्षेत्र हे. (फळपिक निहाय) | |
| ४ | जमिनीचा विकास (मृद - जल संधारणाचे उपचारीत क्षेत्र ) | |
| ५ | कंपोस्ट/ हिरवळीचे / गांडूळ खताचा वापर | |
| ६ | ॲझो / रायझो/ पीएसबी/ उतीसंवर्धन यांचा वापर | |
| ७ | मातीचे नमुने तपासून त्याप्रमाणे रासायनिक खतांचा वापर | |
| ८ | एकात्मिक पीक संरक्षण कार्यक्रमाचा अवलंब | |
| ९ | कृषि विदयापीठे, कृषि प्रतिष्ठान व तत्सम संस्थांना भेटी देऊन तेथील तंत्रज्ञानाचा अवलंब | |
| १० | सिंचनाच्या पाण्याचा किफायतशीर वापर / ठिबक / तुषार वापर करतात काय १ | |
| ११ | स्वतः विकसित केलेले तंत्रज्ञान | |
| १२ | सहकार ग्रामीण विकास, कृषि फलोत्पादन, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील कार्य | |
| १३ | वृत्तपत्र लेख/ कृषि साहित्य इ. मार्गाने केलेले कार्य | |
| १४ | व्यक्ति / संस्थेची प्रकाशने | |
| १५ | सामाजिक कार्य | |
| १६ | कृषि माल निर्यात प्रक्रिया / निर्यातीसंदर्भात केलेले कार्य | |
| १७ | पाणलोटक्षेत्र व्यवस्थापनातील केलेले कार्य सविस्तर माहिती दयावी . | |
| १८ | कृषि व कृषि संलग्न उपक्रम राबविणारी संस्था असल्यास, संस्थेचे कार्य, संस्थेमार्फत शेतक-यानां शेतकरी प्रशिक्षण दिले जाते काय ? | |
| १९ | पर्यावरण वाचविण्यासाठी केलेले भरीव कार्य | |
| २० | आदिवासी क्षेत्रासाठी केलेले उत्कृष्ट कार्य | |
| २१ | र्गत व परदेश दौऱ्याबाबतची माहिती<br>अ. देशाचे नाव व वर्ष<br>ब. कोणत्या तंत्रज्ञानाची पाहणी केली व त्याचा अवलंब कसा केला? | |
| २२ | मान्यता प्राप्त आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी केलेले कार्य | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| २३ | एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब करतात काय? (थोडक्यात माहिती दयावी) | |
| २५ | राबविण्यात येत असलेले नाविन्यपुर्ण प्रकल्प/उपक्रम | |
| २६ | उत्पादीत मालाच्या मुल्यवृध्दी व विक्रीसाठी करण्यातयेत असलेल्या विशेष प्रयत्न | |
| २७ | उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी कृषि व संलग्न क्षेत्रातील विविध योजनांचा घेतलेला लाभ व त्याची परिणामकारकता | |
| २८ | नांमाकित संस्थेचा सदस्य आहे काय? असल्यास त्याच्या कामाचे स्वरुप व केलेले कार्य | |

सही/-
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद

सही/-
जिल्हा अधिक्षककृषिअधिकारी
जिल्हा

# कृषिरत्न पुरस्कार निकष चेकलिस्ट
## प्रपत्र -क (१)

| अ.क्र | व्यक्तीचे / संस्थेचेपूर्ण नाव व पत्ता (सर्वश्री) | जिल्हा | पूर्वी मिळालेले पुरस्कार | कार्यविवरण (उल्लेखनीय बाबी , क्षेत्र इ. ) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**पत्र क (१) ( कृषिरत्न )**

**कृषिरत्न, कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण व शेतीमित्र पुरस्कार करीता कार्यविवरण**

प्रस्तावितपुरस्कार

| अ.क्र | व्यक्ती/संस्थेचे नांव सर्वश्री | पत्ता | विचारात घ्यावयाचे मुद्दे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कोषागारातून वेतन/मानधन घेतात काय ? | अति उल्लेखनिय बाबी कृषिप्रक्रिया,कृषिविस्तार, कृषिनिर्यात,कृषिउत्पादन, पिक फेरबदल, आधुनिक तंत्रज्ञान वापर | जिल्हा / विभागीय स्तरावरील समितीची शिफारस आहे काय ? | जिल्हास्तरावरील गठीत केलेल्या समितीने प्रत्यक्ष प्रक्षेत्रास भेट देउुन शिफारशीसह प्रस्ताव सादर केला आहे काय? | कांही पुरस्कारार्थीच्या प्रक्षेत्रास विभागस्तर समितीने भेट देउुन प्रस्तावाची छाननी करुन शिफारस केली आहे काय? |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |